**PARLE MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

दि. ३०.१२.२०१७

कृपया प्रसिद्धीसाठी

## पार्ले महोत्सवात सृजनता ते शारीरिक श्रम यांचे आठव्या दिवशी झाले कौतुक

मुंबई :“जेथे न पोहचे रवी तेथे पोहचे कवी” ही म्हण थोडी वाढवून “आणि ते दिग्दर्शक दाखवी” असे म्हणता येईल असे प्रतिपादन बालक पालक, यलो व बंधन नायलॉनचे या चित्रपटांचे लेखक अंबर हडप यांनी केले, ते आठराव्या पार्ले-महात्सवातील शॉर्ट फिल्म स्पर्धेत परीक्षक या नात्याने आपले मनोगत मांडत होते. अधिकाधिक सृजनशील मंडळींनी दिग्दर्शनाकडे वळावे असे आवाहन करताना स्मार्ट फोनच्या जमान्यात शॉर्ट फिल्म बनविणे खर्चिक राहिले नसून वॉट्सअप व यूट्यूबमुळे फिल्म असंख्य लोकांपर्यंत पोहोचविणे सोपे झाले असल्याचे ते म्हणाले. तर विटी-दांडूचे दिग्दर्शक गणेश कदम यांनी स्पर्धेत सादर झालेल्या शॉर्ट्स फिल्मचा आढावा घेत पारितोषिकेही जाहीर केली.

अठराव्या पार्ले महोत्सवातील सलग आठव्या दिवशी गुणी स्पर्धकांवर पारितोषिकांचा वर्षाव सुरू राहिला. कलाविभागातील चित्रकला, हस्ताक्षर, रांगोळी व शॉर्ट फिल्मच्या माध्यमातून स्पर्धकांनी आपल्या सृजनशीलतेच्या माध्यमातून विविध सामाजिक विषयांवरील आपल्या संवेदना व्यक्त केल्या. रांगोळी स्पर्धेतून मांडण्यात आलेल्या सफाई कर्मचाऱ्याच्या जीवनावर रांगोळीसाठी नीलेश तोरसकर यांना प्रथम तर धुम्रपानाच्या वाईट परिणामांबाबत रांगोळीसाठी दशरथ वारणकर यांना द्वितीय, डायनॉसरवरील रांगोळीसाठी नागेश सागवे यांना तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच पैशांच्या बाजारात हरवत जाणारा विश्वास दर्शविणाऱ्या मनी ऑर्डर या लघू चित्रपटासाठी जयंत जठार यांस प्रथम पारितोषिक तर वीजबचतीचा संदेश देणाऱ्या इव्हन डेविल कान्ट या लघूपटास द्वितीय तर स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराबाबत पुरुषांचे डोळे उघडणारा इट बिगिन्स विथ मी यासाठी अक्षय वासकर यांना तृतीय पारितोषिक बहाल करण्यात आले. हस्ताक्षर स्पर्धेत बक्षीस मिळवणाऱ्या ८२ वर्षीय समिधा सोनार यांनी तर एक उस्फुर्त कविता करत पार्ले महोत्सव संपत आला की वाईट वाटत असे सांगत जसा गणपती बाप्पा लवकर या तसेच म्हणावेसे वाटते पार्ले महोत्सव पण लवकर यावा, असे मनोगत व्यक्त केले.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्य “पार्ले महोत्सव श्री” स्पर्धेत रोहित शेट्टी (आर. के.एम.)याने “पार्ले महोत्सव श्री २०१७” किताब पटकवला. पार्ले महोत्सवचे प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांच्या हस्ते विजेत्यास किताब प्रदान करण्यात आला. तर नितीन म्हात्रे हा उपविजेता ठरला. या शरिर सौष्ठव स्पर्धेत१५० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.